जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे

संपादक मंडळ
कुमार शिराळकर
डॉ. विठ्ठल मोरे
अजित अभ्यंकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
डॉ. उदय नारकर

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ

मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com


# श्रीमंतांना जास्त श्रीमंत आणि गरिबांना जास्त गरीब करणारे भाजप सरकारचे केंद्रीय अंदाजपत्रक

पॉलिटब्युरो निवेदन

विदेशी थेट गुंतवणुकीचा ओघ आणि सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) प्रकल्पांचा आवाका वाढवून विदेशी आणि देशी भांडवलाला फायदे करून देणाऱ्या सुधारणांचाच मार्ग सुरळीतपणे चालू ठेवण्याचे ठोस आश्वासन भाजप सरकारच्या पहिल्या अंदाजपत्रकात देण्यात आलेले आहे. श्रीमंतांवर कर लावून महसूल वाढविण्याच्या ऐवजी सार्वजनिक खर्चात कपात करून वित्तीय मजबुती आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. याचे परिणाम श्रीमंत अधिक श्रीमंत होण्यात आणि गरीब अधिक गरीब होण्यात होणार आहे.

जागतिक अर्थव्यवस्थेत सुधारणा होण्याची गती अत्यंत धीमी आहे. या पार्श्वभूमीवर अंदाजपत्रकात एका बाजूला गुंतवणुकीच्या नियोजनाद्वारे देशांतर्गत मागणीला गतिमान करण्याचे आणि दुसऱ्या बाजूला अन्नधान्याच्या किंमतीवर नियंत्रण ठेवत बहुसंख्य कामकरी जनतेच्या खरेदी शक्तीत वाढ करण्याचे उपाय यांचे प्रतिबिंब अंदाजपत्रकात पडेल अशी आशा होती.

सेन्ट्रल स्टॅटिस्टीकल ऑर्गनायझेशनने २०१३-१४च्या शेवटच्या तिमाहीसाठी जे आगाऊ अंदाज प्रसिध्द केले आहेत त्यावरून चित्र किती निराशाजनक आहे हे लक्षात येते. सर्वसाधारण विकासदर (२००४-०५च्या स्थिर किंमतीवर आधारित) ४.६ टक्के धरलेला आहे तर औद्योगिक उत्पादन क्षेत्र, खाण उद्योगांचा विकासदर उणे आहे आणि बांधकाम, व्यापार व हॉटेल क्षेत्रातील विकासदरात प्रचंड घसरण होण्याची शक्यता वर्तविली आहे. २०१०-११पासून सार्वजनिक आणि खासगी या दोन्ही क्षेत्रात गुंतवणुकीचे जीडीपी बरोबरचे गुणोत्तर बऱ्यापैकी घसरलेले आहे हे खरे असूनसुध्दा वित्तीय तूट नियंत्रणात ठेवण्याच्या आणि महसुली खर्चाचे जीडीपीशी असलेले गुणोत्तर जवळपास तेच राखण्याच्या हव्यासापोटी हे अंदाजपत्रक एकूण योजना खर्चात प्रत्यक्ष वाढ किती आवश्यक आहे याची दखल घेण्यात अपयशी ठरले आहे.

केंद्रीय योजनांना दिलेले एकूण अंदाजपत्रकीय सहाय्य आणि राज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना दिलेले केंद्राचे सहाय्य यांची अंदाजपत्रकातील तरतुदींशी तुलना करता या सहाय्यात प्रत्यक्षात घसरण झालेली आहे. राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांचा केंद्रीय सहाय्याच्या आकड्यात जरी वाढ झालेली असली तरी केंद्रीय योजनांच्या संदर्भात कोणतेही निर्णय घेण्याचे अधिकार राज्यांकडे नसतात आणि हे देशाच्या संघराज्य रचनेच्या विरोधात जाणारे आहे. गुंतवणुकीला चालना देण्यासाठी केलेले अंदाजपत्रकातील प्रस्ताव सार्वजनिक-खासगी भागीदारी आणि विदेशी थेट गुंतवणूक यावर आधारलेले आहेत. पण त्यामुळे गुंतवणुकीत वाढ क्वचितच होते असा पूर्वीचा अनुभव आहे.

अंदाजपत्रकात प्रत्यक्ष कर कमी करण्यात आलेला आहे. त्यामुळे २२,२०० कोटी रुपयांचा महसुलात तोटा होणार आहे तर अप्रत्यक्ष करात ७,५२५ कोटी रुपयांची वाढ होणार आहे. त्याचा नकारात्मक परिणाम अर्थातच सर्वसामान्य जनतेवर होणार आहे. कोणतीही वैशिष्ट्यपूर्ण करवाढ नसताना अंदाजपत्रकातील महसूलवाढीचे लक्ष्य अफाट आहे आणि गेली दोन वर्षे महसुलाचे पुनर्रचित लक्ष्य अंदाजपत्रकीय लक्ष्यापेक्षा खूपच कमी आहे. अर्थातच त्यामुळे खर्चात लगेच कपात केली जाते. सरकारचा आधार निर्गुंतवणुकीद्वारे मिळणारे ४३,४२५ कोटी रुपये हा आहे. हा आकडा गेल्या वर्षीपेक्षा कितीतरी जास्त आहे पण गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकीय

**आकड्यापेक्षा प्रत्यक्ष निर्गुंतवणूक झालेला आकडा कमी होता.**

**कृषी आणि तद्अनुषंगिक विभाग, ग्रामीण विकास आणि समाजकल्याण तसेच महिला व बालविकास यांच्या केंद्रीय योजनेच्या खर्चात प्रचंड कपात करण्यात झालेली आहे. मनरेगा, इंदिरा आवास योजना यांच्या तरतुदीत कोणतीही वाढ करण्यात आलेली नसून उलट प्रत्यक्ष खर्चात घसरणच झालेली आहे. योजनांवरील एकूण तरतूदच प्रत्यक्षात जवळजवळ चार टक्क्यांनी कमी करण्यात आलेली आहे. नियोजन आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती आणि जमातींसाठी योजनाखर्चाची तरतूद केली पाहिजे. परंतु एकूण योजना खर्चात अनुसूचित जातींसाठीचा योजना खर्च ४७,००० कोटीने, तर अनुसूचित जमातींसाठीचा योजना खर्च १४,००० कोटीने कमी आहे.**

**अंदाजपत्रकात पेट्रोलियमचे अनुदान २२,०५४ कोटी रुपयांनी कमी करण्यात आलेले आहे. त्यामुळे लोकांवरचा बोजा आणखीनच वाढणार आहे. तसेच चलनवाढीचा दबावही वाढणार आहे. खराब मान्सूनचे भाकित करण्यात आले आहे. त्यामुळे अन्नधान्याच्या किंमतीत प्रचंड वाढ होण्याची शक्यता आहे. तरीही अंदाजपत्रकात अन्नधान्यांच्या किंमतीतील दोन आकडी चलनवाढ रोखण्याचे कोणतेही ठोस उपाय सुचविण्यात आलेले नाहीत.**

**औद्योगिक उत्पादन क्षेत्राचा विकास करून रोजगारवाढ करण्याचे उपाय योजण्याच्या बाबतीतही अंदाजपत्रक अपयशी ठरले आहे. गुंतवणुकीचे प्रमाण कमी आहे आणि देशांतर्गत मागणी वाढविण्याचे कोणतेही उपाय योजण्यात आलेले नाहीत. त्याऐवजी अंदाजपत्रकात गुंतवणुकीला कपातींशी जोडत त्याद्वारे खासगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यात आलेले आहे. पण आधीच्या वर्षात या प्रकारे गुंतवणुकीत वाढ करण्यात अपयश आलेले आहे. त्याचबरोबर विमा, संरक्षण आणि स्थावर मालमत्ता यात विदेशी थेट गुंतवणुकीच्या प्रमाणात वाढ करण्याचे घोषित केले आहे. कडव्या विरोधामुळे आधीच्या सरकारला याची अंमलबजावणी करता आली नव्हती.**

**आजच्या परिस्थितीत विकासाला आणि गुंतवणुकीला चालना देणे, रोजगारवाढ करणे आणि महागाई रोखणे याची गरज आहे. पण यासाठी जो मार्ग आखावयास हवा त्यात हे अंदाजपत्रक अपयशी ठरले आहे. हे अंदाजपत्रक खासगीकरण व विदेशी गुंतवणूक यावर अवलंबून असून महसूल वाढविण्याच्या संदर्भात कल्पनाशून्य आहे. हे अंदाजपत्रक नकारात्मक आणि जनविरोधी आणि सर्वसामान्य जनतेवरचा बोजा वाढविणारे आहे.**

**(अनुवाद : राजीव देशपांडे)**

# भाजपचा नवा अध्यक्ष

भाजपच्या अध्यक्षपदी अमित शहा याची झालेली निवड भाजपचे राजकारण कोणत्या दिशेने जाणार आहे याचे निदर्शक आहे.

भाजपच्या ह्या नव्या अध्यक्षावर आरोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे. त्याच्यावर खुनासारख्या गंभीर गुन्ह्याबद्दल खटला चालू आहे. तो गुजरातचा गृहमंत्री असताना घडवून आणलेल्या खोट्या चकमकीशी संबंधित हा खून आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळेस उत्तर प्रदेशातील निवडणूक मोहिमेत केलेल्या प्रक्षोभक भाषणांबद्दल त्याला निवडणूक मोहिमेत भाग घेण्यास निवडणूक आयोगाने बंदी घातली होती.

अशा अध्यक्षाची निवड करून भाजपने गुजरातमध्ये ज्या प्रकारचे धर्मांध राजकारण आणि कार्यक्रम राबवला, त्याच प्रकारचे राजकारण आणि कार्यक्रम देशभर राबवण्याचा आपला हेतू जाहीर केला आहे.

**१० जुलै २०१४**

# गाझावरील इस्त्रायली आक्रमण थांबवा!

गाझावर होत असलेल्या इस्त्रायली हल्ल्यांचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पॉलिटब्यूरो तीव्र धिक्कार करीत आहे. गेले पाच दिवस गाझावर आकाशातून आणि समुद्रावरून प्रचंड बॉम्बफेक होत आहे. २०१२ सालच्या वंशविच्छेदी हल्ल्यांपेक्षा दुप्पट तीव्रतेने हे हल्ले होत आहेत. नागरी वस्त्यांना लक्ष्य करीत सोडलेल्या क्षेपणास्त्रांमुळे अनेक लहान मुलांसह आत्तापर्यंत १२० जीव गेले आहेत.

जमिनीवरूनही हल्ले सुरू करणार असल्याच्या बातम्या येत आहेत. इस्त्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांनी मग्रुरीने जाहीर केले आहे की, इस्त्रायल कोणत्याही आंतरराष्ट्रीय दबावाला भीक घालणार नाही. लेबॅनॉनच्या सीमेवर इस्त्रायलच्या लष्कराने गोळीबार केल्याचे वृत्त आहे. त्यामुळे त्या संपूर्ण भागावर आक्रमणाचा मोठा धोका पसरू लागला आहे. अशा प्रकारची धोकादायक कृती करू नये म्हणून अमेरिकेने आपल्या सर्वात जवळच्या साथीदाराला अटकाव केला पाहिजे.

या हल्ल्यांच्या समर्थनार्थ इस्त्रायलच्या सरकारने दिलेली कारणे धादांत खोटी आहेत. सर्व प्रस्थापित आंतरराष्ट्रीय कायदेकानून व संकेत पायदळी तुडवत केल्या जात असलेल्या या हल्ल्यांचे समर्थन कोणत्याही पातळीवर होऊ शकत नाही.

इस्त्रायलच्या या आक्रमणाचा तीव्र निषेध करावा आणि हे हल्ले ताबडतोब थांबवावेत अशी मागणी आंतरराष्ट्रीय पातळीवर करावी असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पॉलिटब्यूरो भारत सरकारला करीत आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा मंडळाने हे हल्ले थांबवून हे युध्द संपविण्यासाठी त्वरित हस्तक्षेप केला पाहिजे आणि गेल्या ६६ वर्षांपासून आपल्या मातृभूमीचा मूलभूत कायदेशीर हक्क नाकारल्या गेलेल्या पॅलेस्टाईन जनतेला न्याय देण्याच्या दृष्टीने या प्रश्नाची सोडवणूक करण्याची प्रक्रिया चालू केली पाहिजे.

**१२ जुलै २०१४**

# २०१४-१५ चे केंद्रीय अंदाजपत्रक

**प्रभात पटनाईक**

१० जुलै रोजी सादर केलेल्या केंद्र सरकारच्या २०१४–१५ च्या अंदाजपत्रकातील चार बाबी अगदी ठळकपणे नजरेत भरतात. एक, त्यात देण्यात आलेली आकडेवारी सपशेल खोटी आहे. दोन, कॉर्पोरेट घराणी आणि उच्च मध्यमवर्ग यांच्यावर सवलतींची खैरात करण्यात आली आहे. तीन, सार्वजनिक-खासगी भागीदारी आणि सार्वजनिक उद्योगांचे मोठ्या प्रमाणावरील खासगीकरण या दोन मार्गांचा वापर करायचा मार्ग खुला करण्यात आला आहे. आणि चार, सध्या देशाला ग्रासत असलेल्या अरिष्टातून मार्ग काढायचे आश्वासन दिलेले असले तरी, अर्थव्यवस्थेची कुंठित अवस्था आणि चलनवाढ या दोन रोगांवर काहीही इलाज केलेले नाहीत. हे चारही मुद्दे आपण तपशीलाने पाहू.

या अंदाजपत्रकात दिलेली आकडेवारी आणि संपुआ सरकारच्या अंतरिम अंदाजपत्रकातील आकडेवारी यात फारसा फरक नाही. त्या अंतरिम अंदाजपत्रकातील आकडेवारीच्या खरेपणाविषयी त्या वेळीच काही शंका उपस्थित करण्यात आल्या होत्या. महसुली उत्पन्नाच्या आकडेवारीचे अंदाज अतिशयोक्त आणि खोट्या आशा दाखवणारे असल्याचे दाखवून देण्यात आले होते. अंतरिम अंदाजपत्रकाच्या तुलनेत आताच्या अंदाजपत्रकात प्रत्यक्ष करातून मिळणाऱ्या महसुली उत्पन्नात रु.२२,२०० कोटींची घट दाखवण्यात आली आहे. तर अप्रत्यक्ष करातून मिळणाऱ्या महसुली उत्पन्नात रु. ७,५२५ कोटींची वाढ अपेक्षित आहे. अंतरिम अंदाजपत्रकातील खोट्या आशावादी आकडेवारीच्या तुलनेतसुध्दा ही घट १४,७७६ कोटी आहे. तरीही आताचे अर्थमंत्री दावा करतात की, त्यांनी खर्चात काहीही कपात केलेली नाही. एवढेच नव्हे, अंतरिम अंदाजपत्रकात राजकोषीय तूट (म्हणजे सरकारच्या एकूण खर्चापेक्षा महसुली उत्पन्न कमी असणे) सकल घरेलु उत्पादनाच्या (जीडीपी) ४.१ टक्के दाखवली होती. अर्थमंत्री म्हणतात ती तूट तेवढीच राहील. वाढणार नाही. वर म्हटल्याप्रमाणे १४,७७६ कोटींची तूट वाढणार असूनही अंतरिम अंदाजपत्रकात दाखवलेली तूट आताच्या अंदाजपत्रकानुसार वाढणार नाही. हे काय गौडबंगाल आहे? त्यामुळेच या आकडेवारीच्या खरेपणाविषयी जबरदस्त शंका येऊ लागते.

हे दुसऱ्या अंगानेही पहाता येते. २०१३-१४ च्या सुधारित अंदाजानुसार २०१४-१५ मध्ये एकूण कर आणि इतर मार्गाने मिळणाऱ्या उत्पन्नात १६ टक्के वाढ होईल. वास्तव जीडीपीत ५ टक्के वाढ होईल असे गृहित धरले तरी सरकारच्या उत्पन्नात १६ टक्के वाढ होणे शक्य नाही. एक तर, वर दाखवल्याप्रमाणे करांतून मिळणाऱ्या उत्पन्नातच १४,७७६ कोटींची तूट होणार आहे. दुसरे म्हणजे सरकारी उत्पन्नात १६ टक्के वाढ होण्यासाठी चलनवाढीचा दर ११ टक्के व्हायला हवा. चलनवाढीचा दर इतका वाढला की महागाई त्या प्रमाणात वाढणार. महागाई वाढावी, अशी सरकारची निश्चितच इच्छा असणार नाही. वस्तुत: अर्थमंत्र्यांची हातचलाखी त्यांनी स्वत:च उघडी पाडली आहे. या वर्षी झालेली भाववाढ लक्षात घेता मोजलेल्या जीडीपी मध्ये मागच्या वर्षीच्या तुलनेत केवळ १३.४ टक्के वाढ होईल, असा त्यांचा अंदाज आहे. जीडीपीच जर १३.४ टक्केने वाढणार असेल तर सरकारचे उत्पन्न १६ टक्के वाढेल, ते कसे काय? करांत कसलीच वाढ केलेली नसताना, हे होणे शक्यच नाही.

अशा परिस्थितीत, अर्थमंत्र्यांनी आश्वासन दिल्याप्रमाणे २०१४-१५ मध्ये खर्च करायचा झाल्यास तूट ४.१ टक्के हून जास्त होणार हे उघडच आहे. खरे तर तूट वाढली तर काहीच बिघडत नाही. पण वित्तीय भांडवलाला ते आवडत नाही. त्यामुळे सरकारला आपल्या खर्चात कपात करावी लागणारच. आणि ही कपात कशात होणार? गरिबांसाठी आखलेल्या योजनांवरील खर्चात.

मंदीवर मात करायच्या मिषाने अर्थमंत्र्यांनी आणखी एक खेळी केली आहे. देशातील उद्योजकांचे नफे वाढावेत या एकमेव उद्देशाने आयात आणि अबकारी करांत काही फेरबदल केले आहेत. आता या उद्योजकांत प्रामुख्याने आहेत कोण? तर कॉर्पोरेट भांडवलदार. प्रत्यक्ष करांत केलेल्या फेरबदलामुळे उखळ पांढरे होणार आहे परकीय गुंतवणूकदार आणि सुस्थितीतील मध्यमवर्गाचे. आयकरातील सूट २ लाखांवरून २.५ लाखांवर नेण्यात आली आहे. याचा फायदा सगळ्याच मध्यमवर्गाला होईल असे गृहित धरले आहे. पण या वर्गाच्या अंतर्गतही जास्त फायदा करून देण्यात आला आहे, उच्च मध्यमवर्गीयांचा. त्यांना करसवलत मिळणार आहे १.५ लाख रुपयांची. यात ५०,००० रुपयांची सूट, घरबांधणी कर्जावरील व्याजात ५०,००० रुपयांची सूट आणि गुंतवणुकीवरील करात सवलतीसाठी मर्यादेत केलेली ५०,००० रुपयांची वाढ यांचा समावेश आहे. अशा रीतीने करसवलतीत १.५० लाख रुपयांचा फायदा होणार आहे अशी गुंतवणूक करू शकणाऱ्या उच्च मध्यमवर्गीयांना, कनिष्ठ मध्यमवर्गीयांना नव्हे. कर सवलतींचा असा लाभ होणार आहे ते सुस्थितीतील लोकांना.

दुसऱ्या बाजूला सामाजिक क्षेत्रासाठी आणि ग्रामीण विकासासाठी करावयाच्या खर्चाबाबत मात्र कमालीचा कंजूषपणा करण्यात आला आहे. याचा तोटा होणार आहे, तो गरिबांना. अंतरिम अंदाजपत्रकातील तरतुदींमध्ये कपात केलेली नाही, असा अर्थमंत्र्यांनी दावा केला असला तरी त्यातही एक मेख मारलेली आहे.

महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत ५००० कोटी रुपयांची मजुरी थकलेली आहे. मजुरांनी काम केले आहे, पण त्यांना त्या कामाची मजुरी मात्र दिलेली नाही. कारण? त्या वेळच्या अर्थमंत्र्यांनी वित्तीय तूट यायला नको म्हणून पैसेच भागवले नाहीत! तेदेखील आंतरराष्ट्रीय वित्तीय कंपन्यांची मर्जी सांभाळण्यासाठी. हे मजुरांचे थकवलेले पैसे ध्यानात घेता या योजनेसाठी ४३,००० कोटी रुपयांची तजवीज करायला हवी होती. यात आपण भाववाढ ध्यानात घेतलेली नाही. भाववाढीचा विचार करता त्यात आणखी १४,००० कोटींची भर घालून एकूण तरतूद किमान ५७,००० कोटी करायला हवी होती. म्हणजे खर्चाची पातळी मागच्या वर्षाइतकी राखता आली असती. आपण त्यात वाढ करण्याविषयी बोलतच नाही आहोत. प्रत्यक्षात मनरेगासाठी किती तरतूद केली आहे? केवळ ३४,००० कोटी रुपये.

हे अगदी सोपे गणित आहे. मागच्या वर्षी या योजनेवर ३३,००० कोटी खर्च करण्यात आले. त्यात मजुरीचे न दिलेले ५,००० कोटी मिळवले की एकूण तरतूद होते ३८,००० कोटी रुपये. या वर्षी तीच तरतूद कायम करावयाची झाल्यास ३८,००० कोटी अधिक न दिलेली मजुरी ५,००० कोटी असे एकूण ४३,००० कोटी रुपये द्यायला हवे होते. ते न करता या सरकारने रक्कम ठरवली आहे, ३४,००० कोटी रुपये. मागील वर्षीची ५,००० कोटी रुपयांची थकीत मजुरी दिल्यास या वर्षी मनरेगासाठी उपलब्ध होतात केवळ २९,००० कोटी रुपये. त्यात चलनवाढीचा विचार केल्यावर तर ही रक्कम संकुचित होऊन बसते.

भाववाढीचा विचार करता एकूणच सामाजिक क्षेत्रातील गुंतवणूक आटवायचा सरकारचा बेत दिसतो. सरकारचे एकुण वित्तीय धोरण पाहिले की एकच गोष्ट स्पष्ट होते. श्रीमंतांना सवलती आणि गरिबांसाठी आखडता हात. अर्थमंत्री टीव्हीवरील मुलाखतीत करत असलेले सर्व दावे पोकळ आहेत. धनिकांची पालखी वाहणारी राजकीय आघाडी हे रालोआचे वर्णन ती आघाडी नव्याने सार्थ करून दाखवत आहे.

या अंदाजपत्रकाविषयीची तिसरी गोष्ट सर्वात दूरगामी परिणाम करणारी आहे. ती म्हणजे राष्ट्रीयीकृत बँकांसकट सार्वजनिक उद्योगांचे खासगीकरण करायची घोषणा. या क्षेत्रात खासगी गुंतवणुकीची मर्यादा सध्या २६ टक्के आहे. ती ४९ टक्के पर्यंत वाढवायची घोषणा सरकारने केली आहे. संरक्षण आणि विमा धंद्यात तर ४९ टक्के थेट परकीय गुंतवणुकीला मुभा द्यायचे सरकारने ठरवले आहे. २६ टक्क्यांचे ४९ टक्के केल्याने फरक पडत नाही, असा दावा करणे ही शुध्द धूळफेक आहे. खरोखरच काही फरक नाही तर मुळात २६ टक्क्यांची मर्यादा का घालण्यात आली होती, याचे उत्तर द्यावे लागेल. खासगी गुंतवणूकदारांचा हिस्सा २६ टक्क्यांवर गेला की त्यांना नकाराधिकार प्राप्त होतो. शिवाय ४९ टक्क्यांचा भागीदार म्हणजे नाकापेक्षा मोती जड ठरू शकतो. त्याच्या मागण्या आणि दबाव यांच्याकडे सहजासहजी दुर्लक्ष करता येत नसते.

संरक्षण विभागात एफडीआय आणताना अर्थमंत्र्यांनी एक लंगडे समर्थन पुढे केले आहे. आज आपण संरक्षण साहित्य आणि शस्त्रास्त्रे आयात करतो, त्या ऐवजी ती आपणच उत्पादन करायला नको का? असा वरवर बिनतोड वाटणारा सवाल त्यांनी विचारला आहे. पण त्यासाठी संपूर्ण स्वावलंबी अशी १०० टक्के देशांतर्गत गुंतवणूक करण्यापेक्षा ४९ टक्के परदेशी गुंतवणुकीला त्यांनी आमंत्रण दिले आहे. आयातीला पर्याय हवाच. पण त्यासाठी ४९ टक्के परकीय गुंतवणूक कशाला हवी?

आपल्या देशाने संरक्षणात संपूर्ण स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला होता, कृष्ण मेनन हे संरक्षण मंत्री असताना. त्यावेळी शस्त्रास्त्रांच्या उत्पादनात ४९ टक्के परकीय गुंतवणुकीची भाषा कोणीही करत नसे. इतकी परकीय गुंतवणूक असल्याशिवाय आधुनिक तंत्रज्ञान संरक्षणक्षेत्रात येणार नाही, असा दावा कोणी करणे शक्य आहे. पण अर्थखात्यासोबतच संरक्षण खाते सांभाळणारे मंत्रीमहोदय स्वत:च तसे म्हणत नाहीत ना. शिवाय शस्त्रास्त्र उत्पादनात स्वावलंबी होण्यासाठी संशोधन आणि विकासाची मोठी आवश्यकता असते. ४९ टक्के परकीय गुंतवणूक आल्यास संरक्षणातील संशोधनाचे खच्चीकरणच होणार.

राष्ट्रीयीकृत बँकांत खासगी गुंतवणुकीला वाव देण्यासाठी केलेले समर्थनही लंगडेच आहे. त्यासाठी दाखला देण्यात आला आहे बेसेल ३ च्या मापदंडाचा. ही बेसेल ३ काय भानगड आहे? मध्यंतरी अमेरिकेत आणि इतर विकसित भांडवली देशात मोठे आर्थिक अरिष्ट आले होते आणि त्याला त्या देशातल्या बँकानी केलेले घोटाळे कारणीभूत होते, हे सर्वज्ञात आहे. पुन्हा घोटाळे होऊ नयेत यासाठी बड्या बँकांनी बेसेल ३ नावाने काही मापदंड ठरवले. त्यानुसार बँकांजवळ मजबूत भांडवल असले पाहिजे असे ठरवले. अर्थात कुणाही बँकेला त्यात सहभागी व्हायचे वा न व्हायचे स्वातंत्र्य आहे. जगातल्या सर्वच बँकांनी बेसेल ३ हा मापदंड मानलाच पाहिजे असे कसलेही बंधन नाही. ते काही असो. पण बँकेचे भांडवल मजबूत करण्यासाठी खासगी भांडवलच घेतले पाहिजे हा अट्टाहास का? यासाठी एक अगदी सोपा उपाय आहे. केंद्र सरकारने कर्जरोख्याच्या बदल्यात रिझर्व बँकेकडून आवश्यक तितके कर्ज घेऊन ते बँकेच्या भांडवलात घालायचे. त्यासाठी रिझर्व बँकेला तेवढ्या नोटा छापाव्या लागतील. हे कोट्यावधी असोत नाही तर अब्जावधी असोत. ते बँकेजवळ पडून रहातील. चलनात अजिबात येणार नाहीत. त्यामुळे चलनवाढीचा काडीचाही धोका संभवणार नाही. बँकेजवळ जे वापरायचेच नाही, असे प्रचंड भांडवल शिल्लक राहील. बेसेल ३ ची तीच तर मागणी आहे.

अमेरिकेतल्या आर्थिक अरिष्टातून बँकांना बाहेर काढण्यासाठी ओबामांनी त्यांना १३ अब्ज डॉलर्सची गॅरंटी दिली. याचा अर्थ त्यांना १३ अब्ज डॉलरच्या नोटा मोजून दिल्या असा अजिबात नाही. एकही नोट दिली नाही. त्यासाठी अंदाजपत्रकातही तरतूद केली नाही. १३ अब्ज डॉलरची जबाबदारी सरकार घेत आहे, असे लिहिलेला कागदच केवळ दिला. ओबामांनी तेवढे पैसे खर्च केलेच नाहीत. त्यामुळे बेसेल ३ च्या तरतुदीनुसार भारत सरकारने बँकांना भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी नव्याने आर्थिक तरतूद करायची काहीच आवश्यकता नाही. शिवाय, ही तरतूद बँकांवर आणीबाणी आली तर करायची आहे. आता तरी तशी काही परिस्थिती नाही. तेव्हा अर्थमंत्र्यांनी बेसेल ३ चा बागुलबुवा का उभा केलाय? उत्तर उघड आहे; त्यांना बँकांचे खासगीकरण करायचे आहे. अमेरिकन साम्राज्यवादी आणि आंतरराष्ट्रीय वित्त भांडवलाची ती फार जुनी मागणी आहे.

तेव्हा या अंदाजपत्रकाचा रोख काय आहे? त्याला तथाकथित 'आर्थिक शिस्त' आणायची आहे. त्यासाठी गरिबांना लाभदायक असलेल्या सार्वजनिक खर्चाला कात्री लावून सधन आणि सुखवस्तू लोकांकडे संपत्तीचा ओघ वळवायचा आहे. म्हणे त्यांच्याकडे जास्त संपत्ती गेली की ते जास्त खर्च करतील.त्यांना उपयोगी पडणाऱ्या वस्तूंची मागणी वाढेल. मग त्यांचे उत्पादन वाढेल. उद्योगधंदे वाढतील. रोजगार वाढेल. पण यात एक मेख आहे. गरिबांची संख्या प्रचंड आहे. सर्व गरीब मिळून जेवढा खर्च करतात, तितका खर्च हे श्रीमंत व सुखवस्तू करत नाहीत. कारण त्यांची संख्या खूपच कमी आहे.देशातील बाजारपेठेचा विस्तार करायचा तर गरिबांची क्रयशक्ती वाढायला हवी. अर्थमंत्री ते करायच्या भानगडीत पडत नाहीत. ते म्हणतात, श्रीमंत आणि सुखवस्तू लोकांची संपत्ती वाढली तरच देशातील बाजारपेठ वाढेल. आधीच जागतिक मंदीमुळे जगातील बाजारपेठेत वस्तूंचा खप नाही. त्याचा भारतातील मागणीवरदेखील परिणाम होत आहे. त्यात बदल व्हायची चिन्हे नाहीत. सध्याची भाववाढ मागणी वाढल्याने झालेली नाही. ती उत्पादनखर्च वाढवल्याने झाली आहे. अर्थमंत्री म्हणतात, अन्नधान्य खुल्या बाजारात विकून महागाईला मर्यादा घालता येईल. पण तोही उपाय फोलच ठरतो, कारण ते धान्य विकत घेतात सट्टेबाज आणि साठेबाज. त्यामुळे महागाई कमी होण्याचा प्रश्नच येत नाही. देशातल्या अर्थव्यवस्थेच्या मानगुटीवर बसलेले मंदीचे भूत उतरणार नाही.

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

# निवडणूक २०१४ आणि रा. स्व. संघाचा पुनराविष्कार

अर्चना प्रसाद

इंद्रेश कुमार आरएसएसच्या महत्वपूर्ण नेत्यांपैकी एक आहेत. त्यांना मक्का मशिदीतील स्फोटांच्या कटात सामील असल्याच्या संशयावरून विचारणा करण्यात आली होती. आता त्यांनी भगव्या किंवा हिंदुत्ववादी-दहशतवादी कारवायांच्या खटल्यावर पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे. 'इंडियन एक्सप्रेस'बरोबर (२४ मे २०१४) केलेल्या वार्तालापात आरएसएसच्या या नेत्याने सांगितले की, 'निवडणुकांचे निकाल दुसरे स्वातंत्र्य बनून आले आहेत. हे स्वातंत्र्य आम्ही आमच्याच लोकांकडून मिळविले आहे. दिग्विजयसिंह व मनीष तिवारी (काँग्रेसचे नेते) यांना समजले पाहिजे की, त्यांना कोणाचेही आयुष्य संपवण्याचा कोणताही अधिकार नाही. या नेत्यांनी आणि संस्थांनी सार्वजनिकरित्या माफी मागितली पाहिजे.'

## आरएसएस-भाजपाची एकरूपता

आरएसएसच्या या नेत्याचे हे विधान हेही दर्शविते की, २०१४च्या निवडणुकांमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांच्या नेत्यांचे खूप काही पणाला लागले होते. नव्या मोदी सरकारकडून आरएसएसच्या नेत्यांनी अशी अपेक्षा करण्यात काहीही आश्चर्यकारक नाही हे सांगायची गरजच नाही. भाजपच्या विद्यमान यशस्वितेत आरएसएसने संघाच्या नावावरूनच ओळखली जाईल अशी मोठी मूलगामी भूमिका निभावली आहे.

विद्यमान लोकसभा निवडणुका याची साक्ष आहेत की कशा प्रकारे आरएसएसने 'सांस्कृतिक राष्ट्रवादी' संघटना असल्याचा आपला आतापर्यंतचा दिखाऊपणा सोडून एका राजकीय स्वरूपातल्या महत्वाकांक्षी संघटनेचे रूप घेतले. एक असे संघटन ज्याला लोकशाही मूल्यांची कणभरसुद्धा फिकीर नसल्याबद्दलच ओळखले जाते. आरएसएसने हिंदी भाषिक पट्ट्यांमध्ये जवळपास २२५ जागांवर भाजपच्या निवडणूक अभियानाच्या निम्नस्तरावरच्या कार्यासाठी मुख्य आधाराची भूमिका निभावली. ही उल्लेखनीय बाब अशी की, या पट्ट्यातल्या २०१ जागांवर भाजप विजयी झाला आहे. हे जास्तीत जास्त स्पष्ट होत आहे की, जर आरएसएसने हिंदी पट्ट्यात भाजपच्या प्रचारासाठी सामाजिक व राजकीय बांधणी उपलब्ध करून दिली नसती तर मोदीला कॉर्पोरेट हिंदुत्वाच्या आपल्या मॉडेलला जनतेकडून मान्यता मिळवण्यात यश मिळू शकले नसते. आरएसएसच्या कार्यकर्त्यांनी या क्षेत्रात एक प्रकारे 'सोशल इंजिनियरिंग' करून दाखविले, ज्याचा मोदीच्या यशस्वितेत मोठा हात आहे. आणि आरएसएस या प्रक्रियेतील 'हिंदू' राष्ट्रवादाच्या दूरगामी सफलतेच्या गरजेसाठी सामाजिक स्थिरता प्राप्त करण्याची अपेक्षा करतो.

संघाच्या आपल्या नजरेतून, भाजपात आरएसएसच्या कार्यकर्त्यांची बहुसंख्य उपस्थिती, त्याला 'योग्य' विचारधारात्मक मार्ग तयार करण्यासाठी गरजेची आहे. इतके तर सुस्पष्ट आहे की, निवडणुकांनंतर आरएसएसचे कार्यकर्ते भाजपात आपल्या भूमिकेपासून हात आखडता घेणार नाहीत. प्रसारमाध्यमांचा अहवाल सांगतो की, आरएसएसची योजना पुढील दोन-तीन वर्षांत, आरएसएसचे २००० नेते (कॅडर) विभिन्न पातळीवर भाजपात सक्रियरित्या पेरण्याची आहे. त्यांना अपेक्षा आहे की, पाच वर्षाच्या आत हे कार्यकर्ते भाजपाच्या नेतृत्वस्थानी खूप वरपर्यंत पोहचतील व हे सुनिश्चित करतील की मोदींची खाजगी किंवा राजकीय महत्वाकांक्षा भाजपचे अपहरण तर करणार नाही ना? बातम्यांप्रमाणे आरएसएसचे कॅडर प्रस्थापित करणे हे 'स्वाभाविक प्रक्रिये प्रमाणेच असेल आणि त्यासाठी आरएसएसला सरकारला आपल्या रिमोटने कंट्रोल करण्याची काहीही आवश्यकता नाही.

## मोदी व आरएसएस

लक्षात असू द्या, उत्तर प्रदेशात भाजपचे तीन महत्वपूर्ण नेते, जे वाराणसी, लखनौ आणि रायबरेली येथून अमित शहाच्या निर्देशात त्यांच्या उत्तर प्रदेशमधल्या संपूर्ण निवडणूक अभियानात ताळमेळ ठेवत होते. तिन्हीही आरएसएसचे नेते होते. इतर राज्यातही याच प्रकारे केंद्रस्थानी आरएसएसच्या नेत्यांना बसवले होते. हे एक मनोवेधक सत्य आहे की, अशा प्रकारच्या प्रक्रियेच्या भागाप्रमाणे आरएसएसचे तत्कालीन प्रमुख बाळासाहेब देवरस यांनी १९८८-८९ मध्ये गोविंदाचार्य, शेषाद्रि चारी व नरेंद्र मोदी यांना भाजपात पाठवले, त्याला मजबूत करण्यासाठी व त्याचे नेतृत्व सांभाळण्यासाठी. सांगायची आवश्यकता नाही की, नरेंद्र मोदींना तो अनुभव चांगलाच आठवतो आणि म्हणूनच ते आरएसएसबरोबर गहन चर्चांचा आधार घेत आहेत. कारण त्याद्वारे संघटनेवर आपली मजबूत पकड व नियंत्रण टिकून राहील.

आरएसएस जे आता काही काळापूर्वीपर्यंत, अगदी सुरुवातीपासूनच एका अशा तथाकथित 'सांस्कृतिक' संघटनेच्या स्वरूपात काम करत होती. जी संघटना आपली महत्वाकांक्षा दाबून लपवून ठेवत होती या निवडणुकांमध्ये मात्र खुलेपणाने सक्रिय संघटनेच्या स्वरूपात ती समोर आली. तिचे हे रूपांतरण २००२च्या सांप्रदायिक नरसंहारानंतर गुजरातच्या अनुभवावरून प्रभावित होते. विकासाचे एका अराजनीतीकृत्त मॉडेलमध्ये हिंदुत्वाच्या पुनराविष्काराच्या माध्यमातून नरेंद्र मोदी यांनी आपल्या अवती-भोवती इतरांपेक्षाही मोठे व्यक्तिपूजक 'तारामंडल'च फक्त उभारले नाही तर त्या माध्यमातून, कधी-कधी तर त्याच्यासाठी आरएसएसच्या कॅडरचा बळी सुद्धा दिला आहे. हे नरोडा पाटिया प्रकरणात आपल्याला बघायला मिळाले. मोदीने विहिंपचे महत्वपूर्ण कॅडर बाबू बजरंगी व माया कोडनानी यांना वाचवण्यासाठीचा आपला हात आखडता घेतला. प्रत्यक्षात मोदींच्या गुजरात सरकारने त्या वेळेला शिक्षा झालेल्यांची शिक्षा वाढविण्यासाठी वरच्या न्यायालयात अपील दाखल करण्याचा निर्णय घेतला होता. आरएसएसमधील अनेक लोकांनी तक्रारही केली होती की, नरेंद्र मोदी आपल्या राजकीय महत्वाकांक्षेसाठी आपल्या कार्यकर्त्यांना बळी देत आहेत. ही दुसरी गोष्ट आहे की, मोदीचे सरकार या प्रकारच्या विरोधकांच्यासमोर नंतर, शिक्षा वाढवण्याच्या त्या अपिलाच्या विचारापासून मागे सरकले.

नक्कीच, यावर जोर देणे जरूरी आहे की, मोदींची स्वत:ची प्रतिमा आणि आरएसएस द्वारा संघटित नियंत्रणामध्ये वास्तव ताणतणावातून 'तर्काला' एका पातळीपेक्षा जास्त ताणले जाऊ शकत नाही. हिंदू राष्ट्रवाद मोदीच्या डीएनएमध्ये केवळ सामावलेला नाही. त्याच्या सर्व सफलतेची प्रतीके असलेल्या प्रतिमासुद्धा मोदीच्याच आहेत. आरएसएसला अपेक्षा आहे की, मोदीची एक कमजोरी आहे. स्वत:ला जास्त महत्व देणे व आपल्या प्रतिमेला पुढे नेणे. त्याचा मुकाबला विचारात्मक शुद्धतेने आणि संघाचे कॅडर जे भाजपात संघटित सामर्थ्य जोडतील त्यातून वाढलेल्या संघटित शक्तीनेच केली जाऊ शकते.

## राजकीय यशस्वितेसाठी संघटित बदल

या निवडणुकांमध्ये एका मोठ्या सक्रिय राजकीय खेळाडूची भूमिका सांभाळण्यासाठी आरएसएसला आपल्या काम करण्याच्या पद्धती बदलाव्या लागल्या. या दिशेने पहिले पाऊल हे त्यांचे प्रमुख मोहन भागवत यांनी उचलले. ते होते संघाचे आधुनिकीकरण, ज्यात प्रमुख प्राथमिकता युवकांना आकर्षित करण्याची दिली जात होती. २०१२ मध्ये आरएसएसने हा आदेश दिला होता की, ७५ वर्षापेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना कोणतीही संघटनात्मक जबाबदारी सोपविली जाणार नाही.

आरएसएसने शाखांपासून बाहेरपर्यंत आपल्या सदस्यतेचे दरवाजे उघडण्याच्या माध्यमातून आपला विस्तार सुरू केला. अशा प्रकारे आता कोणताही युवक फक्त 'वेबपेज'वर 'जॉईन आरएसएस'वर क्लिक करून सुद्धा आरएसएसमध्ये सामील होऊ शकतो. २०१३च्या मार्च महिन्यापासून सुरुवात करून आज जवळपास २०हजार युवकांनी आरएसएसची सदस्यता घेतली. नोकरदार किंवा व्यावसायिक युवकांना आकर्षित करण्यासाठी संघटनेने 'माहिती आधुनिकीकरण मेळावे' आयोजित केले. आरएसएसने भाजपच्या संघटनकर्त्यांना 'फिडबॅक' प्रणाली निर्माण केली आहे. त्या प्रणालीला दैनंदिन आधुनिक माहिती देणारे सैन्य या युवकांमुळेच परिपूर्ण झाले आहे. निवडणुकांसाठी जी 'कोअर टीम' गठित करण्यात आली होती, त्या टीमने एकूण ५४३ लोकसभा मतदार संघांतून ४५० चा सर्व्हे केला होता. प्रत्येक मतदान केंद्रावर दहा युवकांची नेमणूक केली होती, त्यांना फोनच्या माध्यमांतून माहिती उपलब्ध करून देणे हे काम होते. ज्याद्वारे जास्तीत जास्त मतदार मतदानासाठी बाहेर पडण्यासाठी पक्का प्रयत्न केला जाऊ शकेल.

आरएसएस-संबंधित सर्व संघटनांच्या माध्यमांतून महिलांचे सुद्धा असेच गट गठित करण्यात आले होते. ज्यांना प्रत्येक घरात संपर्क करायचा होता. हे गट सरसंघचालकांचा संदेश 'आपल्या पतीचे ऐकू नका, फक्त भाजपला मत द्या' पुन्हा पुन्हा देत होते. उत्तर प्रदेश, राजस्थान व अन्य राज्यांमध्ये अशा महिला व युवतींच्या गटाला आरएसएसच्या वरिष्ठ कार्यकर्त्यांसोबत जोडले गेले होते. जे त्यांना विचारप्रवर्तक साधने पुरवित होते, मुख्य स्थानिक प्रचाराबरोबर त्यांच्या प्रयत्नांचा ताळमेळ साधत होते आणि हे सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करत होते की, 'हिंदू समर्थन' सुरक्षित राहील. हिंदी भाषिक राज्यांमध्ये स्थानिक पातळीवर ज्या पद्धतीचे ध्रुवीकरण बघायला मिळाले होते, त्याला प्राप्त करण्यासाठी या पद्धतीतील सखोल व सूक्ष्म कामाची गरज होती.

## निवडणूक प्रचाराची महत्वपूर्ण 'एजन्सी'

नक्कीच, आरएसएसच्या शेवटच्या स्तरापर्यंतच्या निवडणूक कार्याच्या यशस्वितेच्या मागे फक्त आरएसएसच्या कार्यकर्त्यांच्या बळाचे स्वरूपच काम करीत नव्हते तर अजून एक रूप ज्यावर लक्ष देण्याची आवश्यकता आहे. उत्तर भारतात जाती आधारित संघटनांमध्ये आरएसएसचे अनेक कार्यकर्ते घुसले आहेत. 'टाटा इन्स्टीट्यूट ऑफ सोशल सायन्सेस'चे असीम प्रकाश यांचा लखनौ व अहमदाबादचा एक अभ्यास आजच्या काळात जाती आधारित समुहांच्या बदलत्या भूमिका आणि बदलाची रचना समोर आणतो. हा अभ्यास दाखवतो की कोणत्या प्रकारे जाती-आधारित समूह सामान्य स्तरावर राजकीय रूपाने सक्रिय व्यक्तींकडून, अशा वरिष्ठ लोकांमार्फत सुरू केले जाते ज्यांचे सरकारमध्ये काही तरी वजन असते. या जाती अंतर्गत समुहांचे सदस्य जास्तीत जास्त 'आधुनिक विचार' असणारे, शिकलेले आणि सामाजिक कार्यकर्ते असतात. व्यावसायिक आणि व्यापारीसुद्धा, जे स्थिर संपत्ती, वाहने, दारू, व्यापार, बांधकाम व्यावसायिक किंवा सुरक्षा एजन्सीसारख्या महत्वपूर्ण क्षेत्रांवर नियंत्रण ठेवतात किंवा महत्वपूर्ण भूमिका निभावतात.

हा अभ्यास हेही दाखवितो की, या प्रकारच्या संघटनांशी संबंधित अजूनही अन्य संघटना यात सदस्य आहेत आणि राज्य स्तरावरील व्यापारी संघटनांचे सदस्यही यात सभासद आहेत. निवडणुकीतील विश्लेषण सांगते की, याच्यातल्या अधिकाधिक संघटना भाजपशी संलग्न आहेत. या परिस्थितीत आरएसएसच्या स्वयंसेवकांचे हे काम असते की या एजन्सीजबरोबर त्यांनी ताळमेळ साधावा व त्यांच्याबरोबर बैठका आयोजित कराव्यात आणि या प्रकारे राजकीय प्रचारासाठी गरजेची असलेली मदत उपलब्ध करावी.

या प्रकारे मोदीच्या कॉर्पोरेट हिंदुत्वाला अनेक पदर आहेत. फक्त वरून खालच्या दिशेने चालवण्यात येणाऱ्या मीडीयाच्या जबरदस्त अभियानाद्वारेच हे संचलित नव्हते तर एक सुनियोजित रणनीतीवर संघटित ढाच्याच्या द्वारे खालून आरएसएसद्वारा त्याला संचलित केले जात होते. या रणनीतीद्वारेच आरएसएस विकासाच्या पर्यायासाठी 'अराजनीतीकरण' या हत्याराच्या सहाय्याने लोकशाही आणि विकास या दोघांचीही एक 'बहुसंख्यवादी' कल्पना घडवत आहे. त्यांच्या नजरेत 'गुजरात मॉडेल' या प्रकारच्या पर्यायाची शुभसंधी आहे व नरेंद्र मोदी त्याचे सर्वेसर्वा अवतार पुरुष आहेत. याकरता मोहन भागवत यांचे हे सांगणे त्यांना उपयुक्त होते की, 'आमचे काम नमो-नमोचा जप करणे नाही; परंतु राष्ट्रीय मुद्दे उठवणे हे आहे.'

## 'बहुसंख्याक' वादाच्या विकासाचे अराजनीतीकरण

अशा 'राष्ट्रीय मुद्द्यां'च्या परिभाषेत व प्रतिमानात हिंदुत्वाचा खरा अजेंडा येऊन जातो. ही आहे त्यांची राष्ट्रीय एकता किंवा जनसेवा, ज्याचा खरा अर्थ आहे, घटनेतील ३७० कलम रद्द करणे, बहुसंख्याकवादी समान नागरी कायदा लागू करणे आणि जाहीरच आहे की, राष्ट्राच्या सेवेकरता अयोध्येत वादग्रस्त जागेवर राम मंदिराचा निर्माण करणे. एका शुभसंधीच्या रूपात मोदी याचे योग्य प्रतिनिधित्व करीत आहेत. मोदीच्या जीवन व कार्याला 'अनुशासन, सेवा व त्याग' या जुन्या साम्राज्यवादी आदर्शांच्या शासनाच्या मूळ प्रतिमानांप्रमाणे दर्शविले जात आहे आणि ते संघाच्या विचारधारात्मक रणनीतीच्या मार्केटिंगचा कणा झाले आहे.

बदललेला आरएसएस हे देशाच्या सर्वव्यापी सामाजिक जाणिवांसाठी

नवे आव्हान समोर घेऊन आले आहे. पहिले मोठे आव्हान आहे ‘बहुसंख्याकवाद’ व आधुनिक विकासाच्या नव्या कल्पनेतून निघालेली विचारधारा. अशा प्रकारच्या परिकल्पना, कल्याणकारी राज्याच्या संकटातून निर्माण झालेल्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक शून्यतेतून सरळ सरळ निघतात, ‘न्यूनतम सरकार, अधिकतम शासन’ ही घोषणा, याकरता सामाजिक स्थान निर्माण करते की, सामाजिक सुधारणांच्या शक्ती कमजोर होतील आणि परंपरागत संस्थांचा पुनराविष्कार केला जाईल व त्यातून लोकशाही प्रक्रियेवरील त्यांची पकड विस्तारली जाऊ शकेल. संघाने अति जलदपणे या वास्तवापासून स्वत:ला बाजूला केले आहे.

दुसरे आव्हान आहे की, संघाने सुव्यवस्थित पद्धतीने घुसखोरी करून जी सामाजिक गठजोड उभी केली त्यामध्ये सामान्य माणसांच्या स्तरावर आपली पकड अजून मजबूत केली आहे. एका अर्थी संघाला एक ‘समावेशी’ संघटन म्हणून प्रदर्शित केल्यामुळे, मोदीच्या विजयाकरता मैदान तयार करायला मदत मिळाली आहे. परत संघाने आपल्या जुन्या ‘ब्राह्मण्यवादी’ ढाच्याला मोडून, नवीन सामाजिक स्तर व जातींना या पातळीपर्यंत आत ओढले की, त्याद्वारे अतिजलदरित्या बाबरी मशीदीचे पतन व गुजरातमधील दंग्यांच्या आठवणी नष्ट केल्या जातील. या पद्धतीने एका फसव्या रूपाने या लोकशाहीविरोधी संघटनेने आपल्या प्रभावाचा विस्तार करण्यासाठी लोकशाही प्रक्रियांचाच वापर केला आहे.

आपल्या सार्वभौमत्वाच्या आधारांना मजबूत करण्याची मनोकामना करणाऱ्या सर्वांना या रणनीतीला सर्व प्रकारे, सर्व रूपात व योग्य पद्धतीने समजून घेतले पाहिजे. तेव्हाच आरएसएसची ‘विचारधारा’ व त्याच्या सोबतचा ‘मैदानी संघर्ष’ या दोन्ही स्तरांवरचा सामना करण्यासाठी आपल्या ‘नवोन्मेषी’ रणनीतीचा विकास होईल.

**(अनुवाद : विजय पाटील)**

# जळगाव : दिवंगत वैद्यकीय प्रतिनिधी विनायक उज्जैनकर यांच्या पत्नीला आर्थिक सहाय्य

गेल्या वर्षी १५ मे २०१३ रोजी कॉ. विनायक उज्जैनकर या वैद्यकीय प्रतिनिधीचा कामावर असताना रेल्वे अपघात होऊन त्यांचा मृतदेह भुसावळ रेल्वे ट्रॅकवर सापडला होता. ते हैद्राबाद येथील मे. पल्स फार्मा लिमिटेड या औषध कंपनीचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत होते. ‘त्या’ दिवशी कंपनीच्या कामावर ते नसल्याची सबब देऊन व्यवस्थापनाने त्यांच्या कुटुंबियांना कोणतीच मदत देण्यास नकार दिला होता. वैद्यकीय प्रतिनिधींच्या MSMRA या राज्य संघटनेने, आंध्रप्रदेश येथील संघटनेच्या फेडरेशनची राज्य शाखा असलेल्या APMSRU यांच्या मदतीने वर्षभर सदर प्रश्नाचा पाठपुरावा करून २७ जून २०१४ रोजी जळगाव येथे संघटनेच्या कार्यालयात एका विशेष कार्यक्रमात कंपनीचे व्यवस्थापकीय अधिकारी वेदुला शास्त्री यांच्या हस्ते कंपनीकडून दिवंगत उज्जैनकर यांच्या पत्नी दामिनी उज्जैनकर यांना दोन लाख रुपयांचा धनादेश मदत म्हणून दिला.



या प्रसंगी संघटनेचे राज्य सरचिटणीस नरेंद्र सिंग व राज्य सचिव मुकुंद रानडे यांनी सामंजस्याने प्रश्न सोडविल्याबद्दल व्यवस्थापनाचे आभार मानले. तसेच या प्रश्नाचा पाठपुरावा केल्याबद्दल संघटनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

**– मुकुंद रानडे**

# इचलकरंजी : सायझिंग, वार्पिंग कामगारांचा प्रांतावर मोर्चा

सायझिंग कामगारांच्या किमान वेतनाची फेररचना करावी, यासह अन्य प्रलंबित मागण्यांसाठी प्रसंगी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांच्या निवासस्थानावर मोर्चा काढण्याचा इशारा लाल बावटा सायझिंग वार्पिंग कामगार संघटनेतर्फे देण्यात आला. संघटनेतर्फे इचलकरंजी, जि. कोल्हापूर येथील प्रांत कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी दिलेल्या निवेदनात हा इशारा देण्यात आला.

सायझिंग, वार्पिंग कामगारांच्या विविध मागण्यांबाबत गेल्या वर्षी १६ जुलैला मंत्रालयात बैठक झाली होती. त्यामध्ये विविध कायदेशीर बाबींची अंमलबजावणी करण्याचा निर्णय झाला होता. मात्र त्याची अद्याप अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी संघटनेतर्फे प्रांत कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

या वेळी वेळकाढू धोरण घेणाऱ्या शासनाच्या निषेधार्थ घोषणा देण्यात आल्या. या वेळी शिष्टमंडळाने प्रांताधिकारी अश्विनी जिरंगे यांच्याकडे मागण्यांचे निवेदन सादर केले. यामध्ये ज्या ठिकाणी १०० टक्के स्पेशल अलौन्सची अंमलबजावणी झालेली नाही, तेथे त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी, डबल ओव्हर टाइमची अंमलबजावणी न करणाऱ्या मालकांवर कायदेशीर कारवाई करावी, किमान वेतन समितीने इचलकरंजी शहरास भेट द्यावी, त्यावेळी आमचे म्हणणे ऐकून घ्यावे व त्यानंतर किमान वेतनाचा आदेश काढावा, अशा मागण्या करण्यात आल्या.

प्राचार्य ए. बी. पाटील, आनंदराव चव्हाण, प्रा. सुभाष निकम, मारुती जाधव, कृष्णात कुलकर्णी, सुर्यकांत शेंडे, हणमंत मत्तूर, दशरथ जाधव, चंद्रकांत गागरे, महादेव बरूर, शिवलाल कोलप, मनोहर ढवळे यांनी आंदोलनात सहभाग घेतला. आंदोलन स्थळी अनेकांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला.

**– प्रा. ए. बी. पाटील**

# वागळे की दुनिया

**सुभाष थोरात**

थोडी अक्कल असली आणि ती पाजळण्याची कला अवगत असली की तुम्ही थेट विचारवंताच्या रांगेत जाऊन बसू शकता. आपल्या महाराष्ट्र देशी थोडीफार अक्कल असणारे आणि ती पाजळण्यात वाकबगार असणारे पायलीचे पन्नास विचारवंत व पत्रकार दिसून येतील. पुरोगामी असणं आणि स्वत:ला पुरोगामी म्हणवून घेणं अशा विचारवंतांचे व पत्रकारांचे व्यवच्छेदक लक्षण सांगता येईल.

अशा विचारवंतांमध्ये रा.रा. निखिल वागळे यांचे नाव अग्रक्रमाने घेता येईल. अर्थात यात खरोखरच अक्कल असलेल्या काही अट्टल समाजवादी साथींचाही समावेश करता येईल. उदाहरणार्थ, त्यांना आणीबाणीच्या काळात संघ बदलतोय असा अचानक साक्षात्कार झाला होता आणि म्हणून त्यांनी जिला कोणी हिंग लावूनही विचारत नव्हते त्या पणतीला जनता पक्षात सन्मानाने सामावून घेतले. त्यावेळेस ती मिणमिणती पणती होती आज तिचा देशाच्या मुळावर उठणारा अग्नीगोल झाला आहे.

हे जरी समाजवादी साक्षात्कारामुळे घडू शकले, तरी पुढे याच प्रश्नावर त्यांनी जनता पक्षाचे तीन तेरा वाजविले आणि चौधरी चरणसिंगांच्या मागे जाऊन लोकदलाची स्थापना केली. त्यावेळी चौधरी चरणसिंग हे कम्युनिस्टांपेक्षाही किती मोठे आहेत याचा शोध त्यांनी लावला. चौधरी चरणसिंगांनी केलेल्या जमीन सुधारणा भारतीय इतिहासात आजपर्यंत घडल्याच नाहीत असाही शोध त्यांनी लावला. कारण त्याच काळात प. बंगालमध्ये डाव्या आघाडीने जमीनसुधारणांचा कार्यक्रम जोरदारपणे सुरू केला होता. त्याला कमी लेखणारा त्यांचा हा शोध होता.

असो हे झाले प्राचीन पुराण. आता ते मधु लिमयेही नाहीत आणि जॉर्ज फर्नांडीस असून नसल्यासारखेच आहेत. पण आजच्या घडीला जे समाजवादी साथी आहेत त्यांना नवनवीन साक्षात्कार होणे काही थांबलेले नाही. अगदी अलिकडचे उदाहरण म्हणजे अण्णा हजारेंचे. त्यांच्यात या समाजवादी साथींना महात्मा गांधी दिसायला लागले होते आणि त्यातून दुसऱ्या स्वातंत्र्याची आवई उठविली गेली होती. पुढे अण्णांचे शिष्योत्तम अरविंद केजरीवाल यांनी हा लढा राजकीय दिशेने नेऊन सरळ 'आम आदमी पार्टी' स्थापन केली. या पार्टीची टोपी घालण्यात परत हेच लोक अग्रेसर आहेत.

या सगळ्या लोकांचे वैशिष्ट्य म्हणजे काटेकोर तर्कशुध्द विचारांचा अभाव. सगळ्या गोष्टी तात्कालिक भावनेच्या भरात 'हुरळली मेंढी गेली लांडग्याच्या मागे' असा सगळा प्रकार. भूतकाळापासून काही शिकणे नाही आणि वर्तमानकाळाचा वस्तुनिष्ठ विचार नाही. सगळ्या गोष्टी व्यक्तिसापेक्ष विचारसरणी वगळून केल्या जातात. उदा. साने गुरुजींनी 'साधना' साप्ताहिक चालू केले ते समाजवादी विचारांच्या व जीवनमूल्यांच्या प्रचारासाठी. पण आज 'साधना' कोणत्या जीवनमूल्यांचा प्रसार करत आहे हेच कळेनासे झाले आहे. गोपीनाथ मुंडे यांच्यावरील श्रध्दांजलीचा अंक पाहिल्यावर ही शंका चांगलीच बळावते.

एखादा माणूस बहुजन समाजात जन्माला आला म्हणून तो जन्मत:च (बाय बर्थ) बहुजन समाजाचा नेता होऊ शकतो काय? जेव्हा त्याची विचारसरणी पूर्णत: बहुजन समाजाच्या हिताच्या विरोधात आणि ब्राम्हण्यवादाची कास धरणारी असते तेव्हा? या न्यायाने जसे गोपीनाथ मुंडे बहुजन समाजाचे नेते ठरतात त्याचप्रमाणे उमा भारती आणि नरेंद्र मोदी हेही बहुजन समाजाचे नेते ठरू शकतात. असो. असे असले तरी या सगळ्या समाजवादी विसंगतीत एक गोष्ट मात्र ते अगदी सुसंगतपणे करत आलेले आहेत ती म्हणजे आंधळा कम्युनिस्ट विरोध. अर्थात हा त्यांचा राष्ट्रीय बाणा नाही तर आंतरराष्ट्रीय बाणा आहे.

हे सर्व पोथी पुराण सांगायचे कारण म्हणजे आपल्या निखील वागळे यांना झालेला नवा साक्षात्कार! मोदी बदलू शकतात पण आपण त्यांना वेळ दिला पाहिजे. पण निखीलभाऊ, मोदी बदलतील म्हणजे नक्की काय होईल ते सांगा की राव. मोदी समाजवादी होतील? की गुजरात नरसंहाराबाबत मुसलमानी टोपी घालून माफी मागतील, की ते नागपूरच्या रेशीम बागेत जाण्याचे सोडून देतील, की अमेरिकेच्या दादागिरीला फाट्यावर मारून तिसऱ्या जगाच्या भल्याचे राजकारण करतील? की अदानी, अंबानी वा तत्सम देशी-विदेशी भांडवलदारांची दलाली बंद करून त्यांना आर्थिक शिस्तीचे धडे देतील? आणि कामगारवर्गाच्या भल्याची धोरणे त्यांनी घ्यावीत असे सुचवतील काय? म्हणजे त्यांना कशासाठी वेळ द्यायचा?

मोदी एक व्यक्ती नाही तर ती एका फॅसिस्ट राजकीय प्रवाहाची वाहक आहे. तो प्रवाह बदलणे कोणत्याही एका व्यक्तीला शक्य नाही. असा विचार करणे म्हणजे मूर्खांच्या नंदनवनात राहण्यासारखे आहे. परत मोदींची तेवढी बौद्धिक कुवतही नाही. तंत्रज्ञांचा आणि लेखनिकांचा मोठा ताफा जवळ बाळगल्याने कोणी विद्वान होत नाही. नाहीतर भुतानला तिबेट म्हणणे आणि सतलजवरूनच परत फिरणाऱ्या सिकंदरला बिहारात दफन करणे या चुका अनवधानाने होत नाहीत, त्या ज्ञानाच्या मर्यादा आहेत. मुस्लिम चार-चार बायका करतात म्हणून त्यांची लोकसंख्या भरमसाठ वाढते असा तद्दन खोटा प्रचार करणाऱ्यांच्या परंपरेत वाढलेल्या मोदींकडून वागळे बदलाची अपेक्षा करीत आहेत यात आम्हाला वागळेच बदलत चालले आहेत की काय अशी शंका येणे स्वाभाविक आहे.

वाल्याचा वाल्मिकी झाला ही रामायणातील मिथ येथे उपयोगी नाही. सत्तेवर आज जी आली आहे ती जातिव्यवस्था, वर्गीय विषमता, स्त्रीदास्यसमर्थक अमेरिकन साम्राज्यवादाची तळी उचलून लोकशाही स्वातंत्र्याचा गळा घोटून पुन्हा नव्या स्वरूपात पुष्यशृंग मित्राची ब्राम्हण्यवादी राजवट आणू पाहणाऱ्या हिंदू धर्मांधांची टोळी आहे. तिचा म्होरक्या अर्थातच नागपुरातील रेशीम बागेत आरएसएसच्या मुख्यालयात बसलेला आहे. आजच्या वर्तमानाचे हे कटु सत्य आहे. छळ आणि कपट यांची हजारो वर्षांची परंपरा असणाऱ्या या नव्या सत्ताधाऱ्यांशी मुकाबला करणे ही साधी सरळ गोष्ट नाही. ती अतिशय गंभीर गोष्ट आहे. त्यामुळे गाफील राहून मोदींना वेळ द्या, मोदी बदलतील असे बोलत राहणे म्हणजे आपल्याच हाताने आपला गळा कापण्यासारखे आहे. शत्रू स्थिरस्थावर होण्याअगोदरच त्याविरोधात मोर्चेबांधणी करणे, त्याला स्थिरस्थावर होऊ न देणे हेच आज खऱ्या समाजवाद्यांचे कर्तव्य आहे. मोदीबद्दल भ्रम बाळगणे म्हणजे त्याच्या

विजयाला आणखी भरभक्कम करणे आहे. निखील वागळयांचा हा साक्षात्कार जरी त्यांच्या समाजवादी परंपरेला साजेसा असला तरी उशीरा का होईना नितीश कुमार यांनी या धोक्याची कल्पना दिलेली आहे.

मोदींना वेळ द्या म्हणणारे मिडीयावाले अरविंद केजरीवालला मात्र वेळ द्यायला तयार नव्हते. अगदी शपथविधी झाल्यापासून ते त्याच्यामागे हात धुवून लागले होते. म्हणजे मिडीयाचा मोदीला एक न्याय आणि केजरीवालला मात्र दुसरा न्याय. आज भाजपवाले म्हणतात आमच्या हातात काही जादूची कांडी नाही. मग प्रचार करताना आणि जनतेला खोटी स्वप्ने दाखवताना हे माहीत नव्हते काय? महागाई कमी होण्यासाठी आणखी एक-दोन वर्षे लागतील असे भाजपवाले आता बिनदिक्कत सांगत आहेत. काँग्रेसवाले हेच सांगत होते. जादूची कांडी हा शब्द मनमोहन सिंग यांचाच आहे. त्याविरुद्ध रान उठविण्याऐवजी मिडीयावाले मूग गिळून गप्प बसले आहेत. खरेतर मिडीयाला जनतेच्या हिताचे राखणदार मानले जाते पण अर्थातच तो तसा नसतोच. वॉच डॉग हा स्वत:साठी मिडीयाने शोधून काढलेला शब्द आहे. पण काही अपवाद वगळता मिडीयाचे एकतर अध:पतन झालेले आहे किंवा तो आता आपल्या मालकाच्या म्हणजे अंबानीच्या आदेशावर भुंकणारा कुत्रा बनलेला आहे.

खरेतर आज सर्व पुरोगामी लोकांनी आपापले हेवेदावे सोडून एकत्र येऊन लढण्याची वेळ आली आहे. जर्मनीमध्ये हिटलरची मानवतेला लाजवणारी कृत्ये जेव्हा बाहेर आली तेव्हा हिटलरचे समर्थक नसलेले पण हिटलरबद्दल गाफील राहिलेले पत्रकार, कवी, लेखक, गायक यांनी आम्हाला फॅसिझम म्हणजे काय हे माहीतच नव्हते असे सांगून हात झटकले. पण आता कोणालाही तसे करता येणार नाही. फॅसिझमच्या धोक्याविरुद्ध जर तुम्ही गप्प बसला तर आता तुम्हाला कोणतीही सबब सांगता येणार नाही. तुम्हीही गुन्हेगारच ठराल. हे भारतीय कलावंतांनी, लेखकांनी लवकरात लवकर लक्षात घेतलेले बरे. जनतेला त्याविरुद्ध सजग करण्यासाठी चाललेल्या लढ्यात सहभागी होणे ही आता काळाची गरज आहे. वेळ न देता, वेळ न दवडता पुढे जाणे भाग आहे. ☐☐☐

# नागपूर : पेट्रोल-डिझेल दरवाढीविरोधात डाव्या पक्षांची निदर्शने

पेट्रोल-डिझेल दरवाढीच्या विरोधात २ जुलै २०१४ रोजी डाव्या पक्षांच्या वतीने व्हरायटी चौकात निदर्शने करण्यात आली. यात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, फॉरवर्ड ब्लॉक, भारतीय बोल्शेविक पार्टी हे पक्ष सहभागी झाले होते. या प्रसंगी निदर्शकांना संबोधित करताना डाव्या पक्षांच्या नेत्यांनी सांगितले की, अच्छे दिन आनेवाले है, अशी घोषणा देऊन सत्तेत आलेल्या मोदी सरकारने कठोर निर्णयासाठी तयार रहाण्याचे आवाहन करीत पेट्रोल-डिझेल दरवाढ केली आहे. कंपन्यांना तोटा होणे व इराक संकटाची कारणे पुढे करून तेल कंपन्यांवरील सरकारचे नियंत्रण संपवण्याच्या पूर्वीच्या सरकारचीच धोरणे हे सरकार पुढे चालवत आहे. निवडणूक प्रचाराच्या दरम्यान जनतेला दिलासा देण्याचे आश्वासन देणारे भाजप नेते जर याच धोरणांवर कायम राहत असतील तर जनतेला दिलासा मिळू शकत नाही.

वास्तविक पाहता महागाईला आळा घालण्यासाठी नवउदारवादी आर्थिक धोरणात आमूलाग्र बदलाची गरज आहे. पण ते न करता दरवाढ म्हणजे विकास आहे असे निर्लज्ज समर्थन भाजपची नेतेमंडळी करताना दिसत आहेत. तेव्हा येत्या दिवसांत आंदोलनासाठी सज्ज राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमात मनोहर मुळे, अरुण लाटकर, रामेश्वर चरपे (माकप), मोहनदास नायडू, बाळ अलोणी, अजय शाहू, शाम काळे (भाकप), मारुती वानखेडे (फॉरवर्ड ब्लॉक), डॉ.शशिकांत वाईकर, राजू डबले (बोल्शेविक पार्टी), शकिल पटेल (डेमॉक्रेटिक सेक्युलर पार्टी) हे सहभागी झाले.

**– अरुण लाटकर**

# नागपूर: केंद्रीय बजेट व महागाईविरोधात निदर्शने

माकप, भाकप, फॉरवर्ड ब्लॉक, बोल्शेविक पार्टी, जनता दल (युनायटेड) या पक्षांच्या संयुक्त वतीने केंद्रीय बजेट व महागाईच्या विरोधात ११ जुलै रोजी रामनगर चौक तर १२ जुलैला जगन्नाडे चौक, नंदनवन, नागपूर येथे निदर्शने करण्यात आली. निदर्शकांना संबोधित करताना माकपचे जिल्हा सचिवमंडळ सदस्य अरुण लाटकर यांनी मोदी सरकारने महागाई वाढवून स्वत:च्या आश्वासनांना तिलांजली देत जनतेची फसवणूक केल्याचे सांगितले. महागाईच्या विरोधात रान पेटवणारा भाजप सत्तेत आल्यानंतर, 'जून ते डिसेंबर दरम्यान नेहमीच महागाई पेटते व त्यावर सरकार काही करू शकत नसल्याची' बेशरम विधाने करीत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

ते पुढे म्हणाले की, बजेटमध्ये कंपन्यांच्या नफेखोरीला वाव देण्यासाठी करांमध्ये सवलती देत असतानाच पेट्रोलियम पदार्थांवरील अनुदानात २२०४० कोटी रुपयांची कपात सुचवण्यात आली आहे, त्यामुळे महागाई आणखी वाढेल. बजेटमधील तरतुदीनुसार दलित, आदिवासींवरील योजना खर्चाच्या हिश्श्यात अनुक्रमे ४७००० कोटी रुपयांची व १४००० कोटी रुपयांची तूट दिसून येत आहे. इतर कल्याणकारी योजनावरील प्रावधान जैसे थे ठेऊन, परकीय गुंतवणुकीसाठी परवाना, देशातील गरिबीचा विचार न करता उच्च प्रतीची शहरे बनवणे, असे श्रीमंतधार्जिणे बजेट मोदी सरकारने सादर केले आहे. या बजेटमुळे अर्थव्यवस्था ताळ्यावर आणण्याचे स्वप्न पूर्णत्वाला जाऊ शकणार नाही. उलट पीपीपीद्वारे सर्व योजना पूर्ण करण्याच्या प्रयत्नांमुळे संपूर्ण




अर्थव्यवस्थेच्या आत्मनिर्भरतेला धक्का पोहचेल. ११ ते १७ जुलै या सप्ताहभर निदर्शनाचा हा कार्यक्रम नागपूरमध्ये राबवण्यात येणार आहे.

कार्यक्रमात माकपचे राज्य सचिवमंडळ सदस्य मनोहर मुळे, रामेश्वर चरपे, संजय रणदिवे (माकप), मोहनदास नायडू, शाम काळे, अजय शाहू (भाकप), राजेश वैद्य, राजू डबले (बोल्शेविक पार्टी), सुरेंद्र शुक्ला, यशवंत चितळे, रवी पैगवार (जनता दल युनायटेड), मारोती वानखेडे (फॉरवर्ड ब्लॉक), अशोक सरस्वती (रिपा सेक्युलर) यांचेसह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले.

**– अरुण लाटकर**

# अकोले: माकपच्या १५ हजारांच्या जबरदस्त मोर्चाचा संदेश: तुटून पडा!... आपण हे करू शकतो!

डॉ. अजित नवले

*दिनांक ११ जुलै २०१४ रोजी अकोले तालुक्यामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने भव्य मोर्चा संपन्न झाला. १५-१६ हजार लोकांचा प्रचंड सहभाग लाभलेल्या या मोर्चाने येथील आजवरच्या सर्व सभा व मोर्चांचे विक्रम मोडले. लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर पसरलेल्या निराशेच्या पार्श्वभूमीवर निघालेला हा मोर्चा म्हणजे काळ्याकुट्ट ढगांमधून चकाकत कडाडत बाहेर पडलेली जणू वीजच होती. या भव्य मोर्चाच्या आयोजनासंबंधीचा वृत्तांत, खास 'जीवनमार्ग'च्या वाचकांसाठी!*

## निराशेचे ढग

सुर्य उगवून वर आला असला, नि जरी दिशा उजळून निघाल्या असल्या, तरी मनामनात ठासून भरलेल्या निराशेच्या काळ्याकुट्ट ढगांचे सावट अजूनही तसंच होतं, अगदी काळरात्री इतकंच अंधारलेलं. २७ मे २०१४चा तो दिवस वर वर उजाडलेला दिसत असला तरी लोकसभा निवडणूक निकालांनी मागे सोडलेल्या निराशेच्या काळ्याकुट्ट अंधाराने मनं तशी काळवंडलेलीच होती. आज पक्षाच्या कार्यशाळेसाठी सारेच प्रमुख जमले होते. पक्षाचे राज्य सचिव डॉ. अशोक ढवळे व राज्य सचिवमंडळ सदस्या मरियम ढवळे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

संपन्न झालेल्या लोकसभेच्या निकालांची समीक्षा व्हावी, पराभवाची मिमांसा समजून घ्यावी, काय चुकलं काय बरोबर होतं याचा अंदाज यावा व पुन्हा नव्याने कामाला सुरुवात करावी यासाठी सदरच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. अजित नवलेंच्या प्रास्ताविकानंतर कार्यकर्ते जसजसे बोलू लागले तसतसे त्यांच्या दाबून ठेवलेल्या भावना व्यक्त होऊ लागल्या. त्यांच्या बोलण्यात निराशेच्या छटा स्पष्ट दिसत होत्या. साऱ्यांच्या भावना आणि मते समजून घेतल्यानंतर डॉ. अशोक ढवळे व मरियम ढवळेंची भाषणे झाली. निष्णात सर्जनने रक्ताचा एक थेंबही वाया न घालवता अचूक शस्त्रक्रिया करावी असा परिणाम त्यांच्या मांडणीत साधला गेला, नि आशेची किरणे पुन्हा चकाकू लागली.

## तुटून पडा... आपण हे करू शकतो!

मोदी लाट, त्या मागील वास्तव, आपल्या भल्या बुऱ्या कामगिरीचे विश्लेषण, आपल्या पुढील आव्हाने नि सगळ्यात महत्वाचे म्हणजे लढ्याच्या वर्गीय स्वरूपामधील आपली भूमिका याची सुबक मांडणी त्यांनी केल्यानंतर हळूहळू एक-एक कार्यकर्ता मनोगतासाठी उभा राहू लागला. लढ्याच्या आजवरच्या आठवणी त्यातून ताज्या होऊ लागल्या आणि त्यातूनच आपण पुन्हा जोरदार चढाई करू शकतो, हा आत्मविश्वास पुन्हा बळावू लागला.

तेरा वर्षापूर्वी मूठभर एसएफआयच्या कार्यकर्त्यांनी केलेली सुरुवात. तेव्हा डोके फोडत, रक्तबंबाळ करीत झालेले आपल्यावरील हल्ले, कोर्ट केसेस, तुरुंगवास, सर्व प्रकारची दडपशाही या साऱ्याला पुरून उरत आपण वाढत राहिलो. कधी उपोषणे, कधी मोर्चे, कधी निदर्शने तर कधी जेल भरो... जनतेच्या प्रश्नांवर आपण लढतच राहिलो. कधी वनजमिनींच्या प्रश्नावर, कधी दारिद्र्यरेषेच्या मुद्यावर, कधी निळवंडे धरणाच्या पाण्यावर, कधी कामगार कर्मचाऱ्यांच्या समस्यांवर आपण न्याय मिळवत राहिलो. या साऱ्याकडे पहात जनतेनेही उदंड प्रतिसाद दिला आपल्याला. लढ्यात प्रत्यक्ष सहभाग घेऊन कधी २ हजार, कधी ५ हजार, कधी ८ हजार, कधी १० हजार, तर कधी १३ हजारांचा प्रचंड सहभाग. अन्न सुरक्षेसाठी तर तब्बल ५३ हजार सह्या देत जनतेने सहभाग नोंदविला. कार्यकर्ते आठवणी मांडत होते नि हे सर्व करणारे आपणच होतो ना? असे वारंवार विचारत होते...होय आपण जर आजवर हे सर्व करू शकलो आहोत, तर नक्कीच..परिस्थिती कितीही प्रतिकूल असू द्यात ...निराशेचे ढग कितीही काळेकुट्ट असू द्यात...आपण तुटून पडलो तर पुन्हा एक जबरदस्त मोहीम फत्तेच म्हणून समजा!....वारंवार हा दृढ विश्वास व्यक्त होत होता.

अखेर निर्णय झालाच. पुन्हा तुटून पडण्याचा. आरपार तुटून पडण्याचा....भव्य मोहीम करून ११ जुलै रोजी अकोले तहसीलवर मोर्चाने श्रमिकांचा आवाज पुन्हा बुलंद करण्याचा!

## जेथे अडचणी आहेत..खजिना तेथेच आहे!

मोहीम ठरली खरी, पण मोहिमेसाठी काळ अत्यंत प्रतिकूल. कार्यकर्ते समस्या मांडू लागले. अडचणींची भली मोठी यादीच तयार झाली. गावोगावी रोजगारासाठी प्रचंड स्थलांतर झाल्याने ओकी बोकी झालेली गावं. म्हातारी माणसं नि पोरंटोरंच काय ती फक्त गावात शिल्लक. उरल्या सुरल्या गावांमध्ये लग्नाचा नि वरातीचा तडाखा सुरू. लग्नसराई कोठे संपते न संपते तोच शेतीच्या मशागतीची पल सुरू होणार. या साऱ्यात कोण ऐकणार आपलं? त्यातच मोदी प्रेमाला तुफान आलेलं. पराभवानं हबकलेली राष्ट्रवादी गावोगावी सतर्क झालेली. आदिवासी विकास मंत्र्यांनी भकास पडलेल्या गावांचा पुळका आणीत दौऱ्यावर दौरा सुरू केलेला. कोठे खुट्टं झालं तरी त्याची लगेच दखल घेतली जाऊ लागलेली. वरून आजवर आपल्यावर असलेल्या आंदोलनाच्या साऱ्या कोर्ट केसेस उकरून आपल्यावर वॉरंट काढलेले. तारखा नि वॉरंटनी कार्यकर्त्यांना बेजार केलेलं. त्यातच ११ जुलै म्हणजे धुवाँधार पावसाचा मोसम. कसा होणार मोर्चा नि मोहीम?

पण मित्रांनो, या समस्याच तर आपल्याला बळ देतात. प्रतिकूलतेतच तर भिडण्याची मजा असते आणि अखेर अनुभव काय सांगतो? जेथे अडचणी आहेत..खजिना तेथेच आहे! प्रत्येक समस्येवर, प्रत्येक अडचणीवर तुटून पडणे हाच तर उपाय आहे!

## सखोल नियोजनाचा रोड मॅप

सर्वात प्रथम सर्व जनसंघटनांना सक्रिय करून ताकद एकवटण्याचा निर्णय झाला. त्यासाठी ११ जुलैच्या अगोदर संघटनावार त्या त्या

जनविभागांची जोरदार आंदोलने संघटित करण्याचे ठरले. ३ जून रोजी किसान सभेच्या नेतृत्वाखाली वनजमीनधारकांचे प्रश्न, निराधारांच्या पेन्शनचे प्रश्न, इको सेन्सिटिव्ह झोन धोरणासंबधीचे प्रश्न, अन्नसुरक्षा व रेशनचे प्रश्न घेऊन शेतकरी जोरदार धडक देतील. मग ९ जून रोजी आशा कर्मचारी, अंगणवाडी ताई, अर्धवेळ परिचर, शालेय पोषण आहार कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी, डेटा ऑपरेटर, ग्रामरोजगार सेवक, घरेलु कामगार आपल्या मागण्यांसाठी संयुक्त धडक देतील. ४ जुलै रोजी बांधकाम कामगारांचा भव्य मेळावा घेऊन प्रत्येकाला ३००० रुपयांचे अर्थसहाय्य मिळवून देण्यासंबधी नियोजन करून त्यांना सक्रिय करण्यात येईल व यासह एसएफआय, डीवायएफआय व जनवादी महिला संघटनेच्या बैठका घेऊन सर्वांना सक्रिय करून मोहिमेत उतरविले जाईल. सक्रिय झालेल्या संघटना व कार्यकर्ते गावोगाव जनतेत जातील व सर्वांना २ रुपये किलो प्रमाणे धान्य, पिवळे रेशनकार्ड, रोजगार व पेन्शनच्या मुद्यावर जनजागृती करीत जनतेला ११ जुलैच्या भव्य मोर्चात सहभागी करून घेतील. त्यासाठी विविध समस्यांवर अर्ज करून घेण्याच्या मोहिमा राबवितील.प्रस्ताव अभूतपूर्व उत्साहात स्विकारला गेला. आता प्रश्न होता प्रत्यक्ष तुटून पडण्याचा.

## जनतेचा विश्वास द्विगुणित झाला

मोहिमेसाठी ठरलेली प्रत्येक पायरी, प्रत्येक आंदोलन, प्रत्येक लढा यशस्वी करण्यासाठी कार्यकर्ते कष्ट उपसत होते व प्रत्येक टप्पा यशस्वी करत होते. प्रत्येक लढ्यात काहीना काही यश मिळाल्याने त्यांचा नि जनतेचा दोघांचाही विश्वास बळकट होत होता. परंतु खरा परिणाम साधला निराधारांच्या यशस्वी लढाईने नि बांधकाम कामगारांसाठीच्या अर्थसहाय्य चेक वाटपाने. तब्बल ४७५ निराधारांना लढ्यामुळे मासिक पेन्शन सुरू झाले नि आणखी ५००-५५० वृध्दांना पेन्शन सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाल्याने गावोगाव लढलो तर मिळतंय हा विश्वास वाढला. त्यातच तालुक्यात १८००च्या वर बांधकाम कामगारांना प्रत्येकी ३०००रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर झाले. रात्रंदिवस त्यांची कागदपत्रे पूर्ण करून घेण्यासाठी कार्यकर्ते प्रचंड झटले नि प्रत्यक्षात त्यांचे चेकच संघटनेने मिळविले. प्रचंड आनंदात बाजारतळावर जंगी मेळावा झाला. डॉ. अशोक ढवळे व सिताराम ठोंबरे आले. त्यांच्या उपस्थितीत एकाच दिवशी ११०० जणांना चेक वाटप झाले. उर्वरितांचे प्रस्ताव बनले नि त्यातून अभूतपूर्व चैतन्य निर्माण झाले. गावोगाव विखुरलेल्या या निराधारांनी, वृध्द पेन्शनधारकांनी नि बांधकाम कामगारांनी 'लढले तरच मिळते' हा संदेश सर्वत्र पोहोचवला नि मोहिमेसाठी अनुकूलता अधिकाधिक वाढत गेली.

## झपुर्झा... झपुर्झा...तल्लीन व्हा, तन्मय व्हा!

गावोगाव सभा, प्रचार, आंदोलने, निदर्शने, पत्रकांचे वाटप, सारखा जल्लोष सुरू होता. दीड महिने भूक तहान, दुखलं खुपलं, घर दार सारं विसरून कार्यकर्ते झटत होते. ध्येयानं वेडं होणं काय असतं याचा प्रत्ययच जणू घेत होते. प्रत्येक प्रतिकूलतेला ठोसा लगावत लढाई सुरू होती. विरोधक पाठलाग करीत, सभा उधळीत, माणसे पेरीत, तक्रारी करीत, अफवा पसरवीत, आरोप करीत पण कशाचाही कसलाच परिणाम नाही... झपुर्झा..झपुर्झा..तल्लीन व्हा..तन्मय व्हा! मोहिमेत असं भान एकवटून उतरलेल्या साऱ्यांना तल्लीनतेचा अनुभव येत होता.

## अखेर ११ जुलैचा दिवस उजाडला

दीड महिन्याची मोहीम, संघटनावार आंदोलने आणि सर्व ताकद एकवटून केलेल्या प्रयत्नांमुळे चांगला प्रतिसाद मिळणार हे तर नक्कीच होते. मात्र आजवरचे गर्दीचे आपणच केलेले उच्चांकाचे विक्रम आज आपणच मोडू याबाबत मात्र निश्चिती नव्हती.

मार्च २०१२ मध्ये पक्षाच्या अकोले राज्य अधिवेशनाची भव्य सभा झालेल्या बाजारतळाच्या वृक्षांच्या छायेखाली हळूहळू जनसमुदाय जमू लागला नि कार्यकर्त्यांचे चेहरे उजळू लागले. मेहनतीला यश येताना दिसत होते. सकाळी ११ पर्यंत बघता बघता १० हजारांचा आकडा पार झाला होता नि आपण १५-१६ हजारापर्यंत मजल मारू असा विश्वास आता कार्यकर्ते बोलून दाखवू लागले होते. दरम्यान मोर्चासाठी डॉ. अशोक ढवळेंचे आगमन झाले नि गगनभेदी गर्जनांच्या निनादात मोर्चाने कूच केले.

श्रमिकांच्या मागण्या बुलंद करणाऱ्या गगनभेदी घोषणा नि सर्वदूर पसरलेले लाल लाल झेंडे. संपूर्ण परिसर जणू फुलून गेला होता. श्रमिकांच्या एकजुटीचे, सामर्थ्याचे दर्शन घडवीत शहरभर फिरून मोर्चा जेव्हा तहसील कार्यालयाच्या आवारात धडकला तेव्हाचा माहोल खरंच अप्रतिम होता. पक्षाच्या विद्यार्थी, युवक आघाड्यांच्या कार्यकर्त्यांचा आक्रमक पवित्रा नि त्याला श्रमिकांमधून मिळालेली प्रतिसादाची साद अवर्णनीयच होती. या तरुण कार्यकर्त्यांनी 'जीवनमार्ग'चे ७००हून अधिक अंक हातोहात विकले!

तहसील कार्यालयासमोरील विस्तीर्ण पटांगणात सजविलेल्या स्टेजसमोर जनसमुदाय विराजमान झाल्यावर सभेला सुरुवात झाली. १५-१६ हजारांच्या त्या प्रचंड सभेच्या अध्यक्षस्थानी पक्षाचे ज्येष्ठ नेते यादवराव नवले यांची निवड करण्यात आली. सभेचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सदाशिव साबळे यांनी केले. आंदोलनाचे सर्व प्रश्न व त्यामागील पार्श्वभूमी मांडून पुढील सभेला त्यांनी सुरुवात केली. दरम्यान डॉ. अशोक ढवळेंच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ तहसीलदारांना भेटण्यासाठी गेले. शिष्टमंडळात डॉ. अजित नवले, यादवराव नवले, लक्ष्मण पथवे, भिकाजी गभाले, शशिकांत बोऱ्हाडे, शकुंतला राजगुरव आदींचा समावेश होता.

## वक्त्यांनी डागल्या तोफा!

सभेमध्ये सर्वच प्रमुख कार्यकर्त्यांची अत्यंत प्रभावी व आक्रमक भाषणे झाली. आपापल्या जनसंघटनांनी यापूर्वी उचललेल्या प्रमुख प्रश्नांची मांडणी वक्त्यांनी केली. बहुतांश वक्त्यांनी आदिवासी विकास मंत्री मधुकर पिचडांवर व त्यांच्या नाकर्तेपणावर जोरदार तोफा डागल्या.येत्या विधानसभा निवडणुकीची पार्श्वभूमी सदरच्या मोर्चास लाभली असल्याने भाषणांमध्ये सर्वत्र भांडवली पक्षांच्या संधिसाधूपणाची व धनिकधार्जिणेपणाची तिखट समीक्षा स्वाभाविकपणे येत होती.

नामदेव भांगरे, राजाराम लहामगे, गणपत थिगळे, गणपत मधे, एकनाथ मेंगाळ, बाबुराव असवले, शिवराम लहामगे, विजय भांगरे, मारुती मेंगाळ, अशोक जाधव, शांताराम गायकवाड, कमलाकर फापाळे, केशव दिघे, हलीमा पठाण, जुबेदा मनियार, आराधना बोऱ्हाडे, सारंगधर तनपुरे, विकास बोऱ्हाडे, हरिभाऊ वाकचौरे, साहेबराव घोडे, राजाराम गंभीरे आदींची यावेळी अत्यंत प्रभावी भाषणे झाली.

## आंदोलनाचे फलित

जनतेच्या प्रचंड एकजुटीचे दर्शन व त्यातून चळवळीला मिळालेली प्रचंड ताकद हे तर या संपूर्ण आंदोलनाचे व्यापक अर्थाने फलित होतेच; पण त्याचबरोबर अनेक स्थानिक प्रश्नही या आंदोलनात मार्गी लावण्यात आले. अत्यंत अभ्यासपूर्ण व तयारीनिशी शिष्टमंडळाने चर्चा केल्याने अनेक

प्रलंबित प्रश्नांवर मार्ग निघाला. बाहेरील मोर्चाचा प्रचंड दबाव व शिष्टमंडळातील प्रतिनिधींचा अभ्यासपूर्ण युक्तिवाद यामुळे खूपच फलदायी परिणाम या संदर्भात साधला गेला.

अन्नसुरक्षेतून वंचित राहिलेल्यांची अपीले आपण यापूर्वीच दाखल केलेली होती. आता त्यांची सुनावणी करण्याचे मान्य करण्यात आले व हजारों अपीले तहसीलदारांसमोर चालवून पात्र लाभार्थींना लाभ देण्यासाठी कालबद्ध कार्यक्रमाचे वेळापत्रक यावेळी जाहीर करण्यात आले. निराधार पेन्शन साठीची सर्व प्रलंबित प्रकरणे तातडीने जमा करून घेऊन त्यावर त्वरित निर्णय घेण्याचे मान्य करण्यात आले. प्रलंबित उत्पन्न दाखले वितरित करण्यात आले. फोपसंडी भ्रष्टाचार प्रकरणी तपास अहवालाची प्रतच शिष्टमंडळाला देण्यात आली. देवठाण भ्रष्टाचार प्रकरणी कारवाईबाबतचा पत्रव्यवहार शिष्टमंडळाला माहितीसाठी देण्यात आला. कडाळेवाडी व वाजेवाडी रस्त्याबाबत ग्रामबैठका घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचे ठरविण्यात आले. दुष्काळप्रश्नी चारा टंचाई असलेल्या गावांचे प्रस्ताव दाखल करून घेऊन कारवाई करण्याचे आश्वासन देण्यात आले. पाणी टंचाई संदर्भात टँकर बाबत निर्णय घेण्यात आले. रोजगार हमीची कामे सुरू करण्याबाबत व रेशन दुकानांमधील काळा बाजार रोखण्याबाबत त्वरित कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. विशेष म्हणजे प्रशासनाला यापूर्वी दिलेल्या निवेदनाच्या आधारे प्रशासनाने खूपच मेहनत घेऊन चर्चेची तयारी केली होती व अनेक प्रश्नांवर मागील दोन तीन दिवस रात्रंदिवस काम करून समाधानकारकपणे कारवाई केल्याचे स्पष्ट झाले होते.

शिष्टमंडळासमोर झालेल्या संपूर्ण चर्चेची व मान्य झालेल्या तसेच कारवाई झालेल्या मागण्यांची माहिती स्वत: तहसीलदार श्री. चंद्रशेखर देशमुख यांनी मोर्चासमोर येऊन दिली. मान्य मागण्यांची घोषणा होताच जनसमुदाय कधी टाळ्यांनी तर कधी घोषणांनी सारखा जल्लोष करीत होता. यानंतर डॉ. अशोक ढवळे यांनी सभेस संबोधित केले.

आपल्या सुपरिचित शैलीत सभेची पकड घेत त्यांनी सर्वप्रथम मोर्चासाठी जमलेल्या प्रचंड जनसमुदायाचे मन:पूर्वक अभिनंदन केले. ते म्हणाले की, अकोलेच्या अनेक आंदोलनांसाठी मी येथे आलोय व यापूर्वीही असेच टोलेजंग मोर्चे आपण काढलेत. मात्र आजवरच्या सर्व गर्दीचे उच्चांक आजच्या मोर्चाने मोडीत काढले आहेत. मोर्चास इतका प्रचंड प्रतिसाद देऊन लाल बावट्यावर जो विश्वास जनतेने दाखविला व हा लढा संघटित करण्यासाठी ज्या कार्यकर्त्यांनी प्रचंड श्रम उपसले त्या सर्वांचे मी हार्दिक अभिनंदन व कौतुक करतो. त्यांच्या या अभिनंदनास सर्वांनी प्रचंड घोषणा व टाळ्यांनी प्रतिसाद दिला.

## केंद्र आणि राज्य सरकारवर जोरदार टीका

डॉ. अशोक ढवळेंनी आपल्या भाषणात केंद्रात नव्याने सत्तेवर आलेल्या नरेंद्र मोदींच्या भाजप सरकारवर व राज्यातील काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की या दोन्ही सरकारांची धोरणे धनिकधार्जिणी व श्रमिकविरोधी अशीच आहेत. अच्छे दिन आयेंगेचा गजर करीत सत्तेवर आलेल्या मोदींनी ज्या प्रकारे येताच रेल्वे भाडेवाढ लादली, गॅसच्या किंमती वाढविण्याचा प्रयत्न केला व जाहीर केलेल्या आर्थिक बजेटमध्ये कॉर्पोरेट कंपन्यांवर सवलतींची उधळण केली व दुसरीकडे शेतीमालाचे किमान आधारभूत भाव उत्पादन खर्चानुसार वाढविण्यास नकार दिला आणि शेती, ग्रामीण विकास, रोजगारनिर्मिती व समाजकल्याण या कळीच्या विभागांवरील खर्चात घसघशीत कपात केली, यावरून हे मोदी सरकार सर्वसामान्यांना, शेतकरी-कामगारांना चांगले दिवस आणणार नसून कॉर्पोरेट कंपन्यांना व मालकांनाच चांगले दिवस आणणार हे उघड आहे.

राज्य सरकारचाही त्यांनी यावेळी खरपूस समाचार घेतला. राज्यभर जनता दुष्काळाने होरपळत असताना राज्याचे सरकार निर्लज्जपणे उदासीन बसले आहे. जनतेला पाणी, जनावरांना चारा, शेतकऱ्यांना कर्जमाफी व वीज बिलमाफी, शेतमजुरांना काम, विद्यार्थ्यांना फी माफी यातून जनतेला आधार देण्याऐवजी वाट्टेल ते बरळण्यातच काँग्रेस-राष्ट्रवादीचे नेते मश्गुल आहेत. या सर्व मागण्या घेऊन किसान सभा संपूर्ण आठवडाभर रस्त्यावर उतरत असून संघर्ष सप्ताहामधून या रंगेल सत्ताधाऱ्यांना राज्यभर जोरदार तडाखा देईल असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

## घराणेशाही व भ्रष्टाचारावर प्रहार

राज्यातील काँग्रेस-राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या घराणेशाहीवरही त्यांनी घणाघाती प्रहार केला. नाशिकमध्ये भुजबळ, सोलापूरमध्ये शिंदे, सिंधुदुर्गमध्ये राणे अशी शेलकी उदाहरणे देत ते म्हणाले की, लोकसभेमध्ये जसे घराणेशाही व भ्रष्टाचाराची योग्य दखल घेत जनतेने भुजबळांचा, शिंदेंचा व राणेंचा तडाखेबाज पराभव केला, तसाच विधानसभेतही याचीच पुनरावृत्ती जनता नक्कीच करेल व अकोले विधानसभा निवडणुकीतही याचप्रमाणे निकाल लागतील. येथील पिचडांची भ्रष्ट घराणेशाही उखडून टाकीत माकपचा लाल बावटा जनता नक्कीच निवडून देईल. त्यांच्या या विधानाला सभेतून प्रचंड टाळ्यांसह प्रतिसाद मिळाला.

## शोषणाविरोधात मशाली उंच धरा!

पुढे ते म्हणाले की आज मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व डाव्या पक्ष-संघटनाच केवळ शोषणाविरोधात अटीतटीने मैदानात उतरत आहेत. शोषण, मग ते आर्थिक असो, सामाजिक असो वा सांस्कृतिक असो, आपला लाल बावटा अशा प्रकारच्या सर्व शोषणाच्या, अन्याय अत्याचारांच्या, विषमता आणि दारिद्र्याच्या विरोधात विनातडजोड संघर्ष करेल आणि प्रत्येक वेळी आजच्या सारखीच कामगार-शेतकऱ्यांची एकजूट या संघर्षाला आणखी प्रभावी बनवील. अंतिमत: पुढील लढ्याला व विधानसभेच्या निवडणुकीला शुभेच्छा देत व सुरू असलेल्या प्रयत्नांना हर तऱ्हेची मदत करण्याचे आश्वासन देत डॉ. अशोक ढवळेंनी आपले भाषण संपविले.

## पुढेच आता पुढेच पाय!

यानंतर डॉ. अजित नवले यांनी लढ्याची पुढील दिशा स्पष्ट केली. मोर्चामधून यानंतर चारा व दुष्काळाच्या प्रश्नावर पुन्हा संघर्ष उभा करण्याची वारंवार मागणी होत होती. त्याची योग्य दखल घेत त्यांनी राज्य सरकारला आठ दिवसांची मुदत देत असून त्याच्या आत दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली. येत्या आठ दिवसांत दुष्काळ जाहीर न केल्यास माकप पुन्हा रान पेटवेल. दुष्काळ, इको सेन्सिटिव्ह झोन व शेतकऱ्यांना पेन्शनच्या मुद्यांवर येत्या १९ जुलै रोजी पुन्हा तहसील कार्यालयावर दंडुके मोर्चा काढण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला. लाल बावटा झिंदाबाद! च्या प्रचंड घोषणांनी त्यास जनसमुदायाने प्रतिसाद दिला. या घोषणांच्या निनादातच मोर्चाची सांगता झाली.

तुटून पडा!...आपण करू शकतो! असा दुर्दम्य विश्वास या जबरदस्त मोर्चातून वारंवार अधोरेखित झाला होता. केवळ मोर्चाबाबत नव्हे...येत्या विधानसभेच्या रणांगणातही विजयासाठी आता तुटून पडण्यासाठी कार्यकर्ते सज्ज झाले होते! ❑❑❑